महाराष्ट्र शासन - वन विभाग

# कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

मु.पो.- कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा- सांगली-४१६३०९महाराष्ट्र

दूरध्वनी क्रमांक -०२३४६- २७१२१२ ई-मेल -princpalkundal@gmail.com

## सेवानिवृत्त शाखा/उपअभियंता दर्जाच्या अधिका-यांची सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेकामी जाहिरात.

कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल सेवानिवृत्त शाखा/उपअभियंता दर्जाच्या अधिका-यांची सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेकामी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणा-या सेवानिवृत्त अधिका-यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | पद संख्या |
|---|---|---|
| १ | कुंडल वन अकादमीच्या आवारामधील सर्व इमारती व परिसर देखभाल, दुरस्तीकामी तांत्रिक मार्गदर्शन करणे, अकादमीच्या स्थापत्य बांधकामाविषयीची अंदाजपत्रके तयार करुन त्यासंबंधी तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेणे, मोजणी पुस्तक लिहणे, इमारत रजिस्टर अद्ययावत ठेवणे, स्थापत्यशास्त्र विषयावर व्याख्यान देणे, प्रबोधिनीकडील सौर उर्जेवरील वीज निर्मिती प्रकल्पाची देखभाल व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे, प्रबोधिनीकडील बी. एस. एन. एल. इंटरनेट सेवा सुस्थितीत ठेवणेबाबत आवश्यक ते नियंत्रण ठेवणे, इतर अनुषंगिक कामे. | ०१ |

**अर्ज सादर करण्याचा कालावधी** :-दिनांक ०७.०२.२०२५ ते २१.०२.२०२५ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) पर्यंतचा आहे. सदरचा अर्ज हा खालील पत्त्यावर लिखित स्वरुपात समक्ष, पोस्टाव्दारे अथवा ईमेलव्दारे सादर करावा. तसेच अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवानिवृत्तीचा आदेश (Pension Payment Order) व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. या व्यतिरिक्त अर्जासोबत सेवानिवृत्ती वेळी मिळत असलेल्या वेतनाचा तपशिल जोडावा.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :- महासंचालक ,कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, क्रांती सहकारी साखर कारखानाशेजारी, कुंडल-विटा रोड, ता. पलूस जि. सांगली, पिन- ४१६ ३०९.

**अटी व शर्ती :-**

१. अर्जदार हा शाखा/उपअभियंता या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

२. विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांची निवड प्रक्रिया व नियुक्ती करताना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदीचा अवलंब करण्यात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी हा शारिरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

५. सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता करार पध्दतीने करण्यात येत असलेने, संबधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नाही.

६. कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे निवासी प्रशिक्षण आयोजित केले जात असलेने संबंधितांना कुंडल वन अकादमीमध्ये निवासस्थानी राहणे अनिवार्य राहील.

७. सदरची सेवा ही करार पध्दतीने असल्याने, नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार महासंचालक, कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल यांना राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी हा सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

९. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Intrest) जाहीर करणे आवश्यक राहील.

Mahabharti.in

१०. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या माहिती/कागदपत्रे/आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्याच्यांवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

१२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ अन्वये, विहीत केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार मासिक व पारिश्रामिक भत्ते देण्यात येतील.

(एन. आर. प्रविण, भा.व.से.)
महासंचालक,
कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल.

Mahabharti.in

# अर्जाचा नमुना

| सेवानिवृत्त शाखा / उपअभियंता दर्जाच्या अधिका-यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करणेसाठी करावयाचा अर्ज. | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | ईमेल आयडी | |
| ५ | जन्मतारीख | |
| ६ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ७ | अर्ज सादर करतेवेळीचे वय | |
| ८ | शैक्षणिक अर्हता | |
| ९ | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता. | |
| १० | सेवानिवृत्त झालेल्या पदाचे नाव. | |
| ११ | सेवानिवृत्तीच्या दिवशी अंतिम वेतन. | |
| १२ | सध्या मिळणारे निवृत्ती वेतन<br>(७ वा वेतन आयोगानुसार मंजूर झाल्याप्रमाणे) | |
| १३ | एकूण शासकीय सेवेचा कालावधी. | |

| | अ.क्र. | कार्यालयाचे नाव | काम केलेल्या पदाचे नाव | कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १४ | सोपविण्यात येणा-या कामाचा अनुभव आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशिल. | |
| १५ | शासकीय सेवेत असताना कधी विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही झाली आहे का? | |
| १६ | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाकडून अंतिम विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही चालू आहे काय? याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे का? | |
| १७ | सेवानिवृत्त वेतनाचा प्रदान आदेशची प्रत (PPO) जोडली आहे का? | |
| १८ | संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान आहे का? असल्यास तपशिल. | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य/चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे.

टिप :- अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

(                                        )

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

सोबत कागदपत्र :-

१) कार्यालय प्रमुखाचा सेवानिवृत्ती आदेश.
२) विभागीय चौकशी चालू किंवा प्रस्तावित नसलेबाबतचे प्रमाणपत्र.
३) संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान असलेबाबतचे MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा अन्य पुरावा.